Literacy for a Billion

Movie: Mala Ek Chanas Hava
Year: 2012

Song: Tumcha Pokland Chalu Kara
Lyricist: Dr. Shrikant Narule

विहीर खणायला बघा दाजीबा
पोकलंड चालवून जरा
तुम्ही पोकलंड चालवून जरा
बटन दाबून गिअर टाकून
मशिन चालू करा
तुमचा पोकलंड चालू करा

ए घरच्या नळाला न्हाई का पाणी
वागतीस का येड्यावानी
तू वागतीस का येड्यावानी
जोर जरा लावू दे
धडक मारू दे
खडक फोडू दे जरा
म्हणतीस पोकलंड चालू करा
जोर जरा लावा खडक फोडा
प्रितीचा डंपर भरा
तुमचा पोकलंड चालू करा

तू दिसतेस गं गुलछडी
मी हाय गं तरणागडी
तू दिसतेस गं गुलछडी
मी हाय गं तरणागडी
मला रातीचा लागना डोळा

ज्वानीच्या छळत्यात झळा
अहो ज्वानीच्या छळत्यात झळा
आग ही विझवा पाण्यानं भिजवा
पंप हयो चालू करा
तुमचा पोकलंड चालू करा ना
जोर जरा लावा खडक फोडा
प्रितीचा डंपर भरा
तुमचा पोकलंड चालू करा

तुम्ही मनात भरला कसं
मला तुमचंच लागलय पिसं
तुम्ही मनात भरला कसं
मला तुमचंच लागलय पिसं
अगं समजून उमजून जरा तू वाग
काय पाहिजे तुला ते सांग
काय पाहिजे तुला ते सांग
जीव झाला भित्रा भूत ही उतरा
जंतर मंतर करा
तुमचा पोकलंड चालू करा
जोर जरा लावा खडक फोडा
प्रितीचा डंपर भरा
तुमचा पोकलंड चालू करा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*